१०३ व्या वार्षिक अहवालाचा गोषवारा -

माननीय सभासद,

आपल्या बँकेचा आर्थिक वर्ष २०२०-२१ चा १०३ वा वार्षिक अहवाल सादर करताना संचालक मंडळाला आनंद होत आहे.

१. जागतिक अर्थव्यवस्था व भारत

आर्थिक वर्ष २०२०-२१ हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी आव्हानात्मक वर्ष होते. कोव्हिड-१९ संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर वर्षाची सुरुवातच अनिश्चित वातावरणात झाली. जागतिक अर्थव्यवस्था मंदावलेली असतानाच कोव्हिड-१९चा आघात अर्थव्यवस्थेवर झाला.

वर्ष २०२० मध्ये जागतिक अर्थव्यवस्था ३.३ टक्क्यांनी घसरली. जगभरातील कडक टाळेबंदीमुळे व्यवसायांत झालेली घट, कमी मागणी व बंद पडलेले उद्योग याचा विपरीत परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसून आला. जगभरातील मध्यवर्ती बँकांनी व्याजाचे दर कमी ठेवून व पुरेशी तरलता राखून अर्थव्यवस्थेस पाठबळ दिले.

अमेरिकन अर्थव्यवस्था वर्ष २०२० मध्ये ३.५ टक्क्यांनी रोडावली तर युरोपियन अर्थव्यवस्था तीव्रपणे घसरून ६.६ टक्क्यांनी खाली आली. युरोपातील इटली, स्पेन, ऑस्ट्रिया व फ्रान्स या अर्थव्यवस्थांवर कोव्हिड-१९ या साथीचा सर्वाधिक परिणाम दिसून आला.

अमेरिकेसह सर्वच देशांमध्ये वर्षाच्या पहिल्या व दुसऱ्या तिमाहीत आर्थिक व्यवहार थंडावले. तिसऱ्या तिमाहीत काही प्रमाणात निर्बंध शिथिल झाल्यावर अर्थव्यवस्थेत अंशतः सुधारणा दिसून आली. परंतु कोव्हिड-१९च्या केसेसमध्ये वाढ झाल्यावर जागतिक अर्थव्यवस्थेची गती पुन्हा मंदावली.

उदयोन्मुख अर्थव्यवस्थाही २.२ टक्क्यांनी खाली आल्या. परंतु याला अपवाद राहिला फक्त चीन. चीनची अर्थव्यवस्था २.३ टक्क्यांनी वाढली. कोव्हिड-१९च्या निराशाजनक वातावरणातही पायाभूत सुविधांवरील गुंतवणुकीस चालना, उत्पादन क्षेत्रात वाढ करुन चीनने हे साध्य केले.

एकूणच जागतिक अर्थव्यवस्थेने या काळात अतिशय कठीण परिस्थितीचा सामना केला. परिणामी सर्व देशांच्या मध्यवर्ती बँकांना आक्रमक धोरण अनुसरणे क्रमप्राप्त झाले. परिणामी मध्यवर्ती बँकांनी अर्थव्यवस्थेत तरलता राखण्याकरिता रोखे खरेदी योजना कार्यान्वित केल्या किंवा आधीच्या योजना विस्तारल्या.

आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील भारतीय अर्थव्यवस्था:

कोव्हिड-१९च्या प्रादुर्भावांमुळे होणाऱ्या मानवी हानीचा विचार करता भारत सरकारने कडक निर्बंध देशभरात लागू केले. या साथीचा नजीकच्या काळात अर्थव्यवस्थेस बसणारा आघात बघता दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यावर भर देण्याचे धोरण अवलंबिण्यात आले. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१९-२०च्या शेवटास देशभरात टाळेबंदी जाहीर करण्यात आली. या टाळेबंदीचा उद्देश होता की अर्थव्यवस्था या तात्पुरत्या निर्बंधांमधून पुढे जाऊन सावरेल, परंतु मानवी जीवन मात्र अमूल्य आहे व ते वाचविले पाहिजे.

या पार्श्वभूमीवर गेल्या अनेक दशकांत न पाहिलेली घसरण भारतीय अर्थव्यवस्थेने या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत अनुभवली. भारतीय अर्थव्यवस्था पहिल्या तिमाहीत तब्बल २४.४ टक्क्यांनी आकुंचन पावली. परंतु, जसजशी टाळेबंदी शिथिल होत गेली, तशा महत्त्वाच्या आर्थिक निर्देशांकात सुधारणा दिसून आल्या. संपूर्ण आर्थिक वर्षाचा विचार करता मात्र भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर मागील

वर्षीच्या ४ टक्के वाढीच्या तुलनेत अहवालवर्षी ८ टक्क्यांनी कमी झाला.

या आपत्कालीन परिस्थितीतही रब्बी पेरण्यांमध्ये झालेली वाढ व चांगल्या पावसामुळे कृषी क्षेत्राने ३ टक्क्यांची वाढ नोंदविली. परंतु उद्योग व सेवा क्षेत्रे मात्र अनुक्रमे ९.६ व ८.८ टक्क्यांनी रोडावली. कोव्हिड-१९ व त्यानुसार योजलेले कडक निर्बंध यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली हानी कृषी क्षेत्रामुळे काही प्रमाणात सावरली.

या काळात अर्थव्यवस्थेवरील ताण कमी करण्याकरिता अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. अर्थव्यवस्थेत पुरेशी तरलता राखण्यात आली, तर कर्जांवरील व्याजदरात कपात करुन तसेच कर्जांवरील हप्ते पुढे ढकलून कर्जदारांना दिलासा देण्यात आला.

वर्षाच्या पहिल्या सहामाहीत महागाई दर हा भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रमाणित केलेल्या कमाल ६ टक्क्यांच्याही वर राहिला. परंतु तद्नंतर भाजीपाला व अन्नधान्यांच्या किमतीतील उतार तसेच पुरवठा-साखळीतील अडचणी दूर झाल्यानंतर वर्ष-अखेरीस महागाई दर हा ५.५२ टक्क्यांवर स्थिरावला.

कर-महसुलात झालेली घसरण तसेच अर्थव्यवस्था पुनरुज्जीवनासाठी झालेल्या खर्चातील वाढीमुळे वित्तीय तूट (Fiscal Deficit) ही ३.५ टक्के या अंदाजित लक्ष्यावरुन तीव्र प्रमाणात वाढून ९.५ टक्क्यांवर पोहोचली.

कोव्हिड-१९ साथीमुळे व्यवसाय व प्रवासावर आलेल्या निर्बंधांमुळे तेलाची मागणी कमी होऊन आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमतीही घसरल्या. तेलाच्या वायदे बाजारातील किमतीही इतिहासात पहिल्यांदाच उणे (Negative) स्थितीत पोहोचल्या. भारताच्या तेलाच्या आयातीतही मोठ्या प्रमाणात घट होऊन १७ वर्षांनंतर प्रथमच चालू खात्यात (Current Account Surplus) २ टक्के शिल्लक राहिली.

भारतीय रिझर्व्ह बँकेनेही आर्थिक वर्षाच्या आरंभापासूनच नरमाईचे पतधोरण अवलंबिले. मे, २०२० मध्ये रेपो दरात ०.४० टक्क्यांची कपात करण्यात आली व रेपो दर ४ टक्क्यांवर आणण्यात आला. गेल्या काही वर्षांतला हा सर्वात कमी रेपो दर आहे. मागील एक वर्षापासून त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. याशिवाय, अर्थव्यवस्थेतील तरलता राखण्याकरिता अनेक उपाययोजना कार्यान्वित करण्यात आल्या. यामध्ये ओपन मार्केट ऑपरेशन्स (OMO), दीर्घ मुदतीचे रेपो कर्ज (LTRO), वित्तीय संस्थांना विशेष पुनर्वित्त योजना (Special Refinance Facility) व म्युच्युअल फंडांकरिता स्पेशल लिक्विडिटी विंडो (Special Liquidity Window) यांचा समावेश होता.

अर्थव्यवस्था हळूहळू पूर्वपदावर येत असल्याचे बघून भारतीय रिझर्व्ह बँकेनेही पतधोरणात बदल केले. त्यानुसार रोख राखीवता प्रमाण (CRR) पुन्हा ४ टक्क्यांवर नेणे, नियमित लिक्विडिटी व्यवस्थापन व व्हेरिएबल रेट टर्म रिव्हर्स रेपो (Variable Rate Term Reverse Repo) इत्यादी व्यवहार पुन:श्च सुरु करण्यात आले. परंतु, हे सर्व उपाय केल्यानंतरही बँकांकडील तरलता ही अधिक प्रमाणातच राहीली.

वित्तीय बाजार विश्लेषण:

कॅलेंडर वर्ष २०२० मध्ये जागतिक अर्थव्यवस्थांमधील व्याजदर हे सार्वकालीन कमी स्तरावर राहिले. परंतु, वर्ष २०२१च्या सुरुवातीपासून कडक पतधोरणाची अंमलबजावणी तसेच लसीकरणाने पकडलेला वेग याच्या परिणामी व्याजदरात पुन्हा वाढ होण्यास सुरुवात झाली.

देशांतर्गत सरकारी कर्जरोख्यांचे व्याजदरही जागतिक परिस्थितीनुरुप आर्थिक वर्षाच्या पूर्वाधात कमीच राहिले. पहिल्या सहामाहीत पतधोरणातील नरमाई, तेलांच्या किमतीतील उतार आणि अतिरिक्त तरलता यामुळे व्याजदरात घसरण दिसून आली. परंतु,

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत मात्र व्याजदर वाढायला लागले. वार्षिक अंदाजपत्रकात (Budget) सरकारचे अपेक्षेपेक्षा जास्त कर्जाऊ रक्कम बाजारातून उचलण्याचे धोरण (Borrowing Programme), तसेच अमेरिकन व्याजदरात झालेली वाढ व तेलांच्या चढ्या किमती यांचा एकत्रित परिणाम व्याजदरांवर दिसून आला. आर्थिक वर्ष-अखेरीस दहा वर्षीय कर्जरोख्यांचा व्याजदर हा ६.१८ टक्क्यांवर पोहोचला.

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये भारतीय शेअर बाजारात भांडवलाचा ओघ सुरुच राहिला. त्यामुळे सेन्सेक्स (Sensex) आणि निफ्टी (Nifty) हे दोनही निर्देशांक वाढून अनुक्रमे ५०,०२९ व १४,८६७ अंकांवर पोहोचले.

भारतीय शेअर बाजारात वाढलेली विदेशी गुंतवणुक तसेच कमकुवत अमेरिकन डॉलरमुळे, जून २०२० पासून रुपयाचे मूल्य वाढू लागले. परंतु, भारतीय रिझर्व्ह बँकेने आखलेल्या अनेक उपाययोजनांमुळे अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य आर्थिक वर्षात स्थिर राहून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹ ७३.२१ वर पोहोचले.

सर्वंकष मूल्यमापन:

कोव्हिड-१९ या साथीमुळे आर्थिक वर्ष २०२०-२१ या संकटाचा मुकाबला करण्यातच गेले. भारतीय अर्थव्यवस्थाही तांत्रिकदृष्ट्या मंदीमध्ये प्रवेश करती झाली. आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोनही तिमाहीत अर्थव्यवस्था आकुंचन पावली. केंद्र सरकार व भारतीय रिझर्व्ह बँकेने अर्थव्यवस्था सावरण्याकरिता, तसेच समाजातील सर्व घटकांना मदत मिळावी याकरिता आर्थिक आघाडीवर अनेक निर्णय घेतले.

वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत निर्बंध शिथिल झाल्यामुळे उद्योग-व्यवसायाचे बंद पडलेले चक्र पुन्हा सुरु झाले. त्यामुळे या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर हा ०.४ टक्के तर चौथ्या तिमाहीत १.६ टक्के इतका राहिला. भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर हा ९.५ टक्के राहील असा अंदाज वर्तविला आहे. परंतु, यापुढील काळात भारतीय अर्थव्यवस्था रुळावर येण्याकरीता लसीकरणाचा वेग, कोव्हीड-१९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटेची व्याप्ती तसेच पतधोरणांतील लवचिकता इत्यादी बाबी महत्वाच्या असतील.

सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर हा आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस खालीच राहून दुसऱ्या सहामाहीपासून उंचावेल असा अंदाज आहे. कोव्हिड-१९च्या दुसऱ्या लाटेचा आर्थिक वर्ष २०२१-२२च्या पहिल्या तिमाहीवर परिणाम जाणवला. त्यामुळे आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर हा कमीच राहील. या पार्श्वभूमीवर, एस ॲण्ड पी या पतमानांकन संस्थेनेही भारतीय रिझर्व्ह बँकेप्रमाणेच आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर हा ९.५ टक्के इतका राहील असा सुधारित अंदाज वर्तविला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकही पुढील पतधोरणात सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दराचा फेर आढावा घेईल.

२. आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील आपल्या बँकेच्या कार्यसिद्धीची ठळक वैशिष्ट्ये

- बँकेचा एकूण व्यवसाय दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹६३,४२२.१३ कोटींवरून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹६७,०४२.३१ कोटींवर पोहोचला. व्यवसायातील ही वाढ ₹३,६२०.१८ कोटी इतकी आहे.
- बँकेच्या एकूण ठेवी दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹३८,०८३.४९ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹४०,८००.६१ कोटींवर पोहोचल्या. ठेवींमधील वाढ ही ₹२,७१७.१२ कोटी इतकी आहे.
- बँकेच्या कासा (CASA) ठेवींमध्ये ₹१,७७३.८२ कोटींची वाढ होऊन दि. ३१ मार्च, २०२०च्या

₹१०,७२३.९४ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी कासा ठेवी ₹१२,४९७.७६ कोटींवर पोहोचल्या.

- बँकेचा किरकोळ कर्ज-व्यवसाय गतवर्षीच्या ₹१०,८५६.९४ कोटींवरुन ₹१,१३६.१३ कोटींनी वाढून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹११,९९३.०७ कोटींवर पोहोचला.
- बँकेचा ढोबळ नफा दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹६५१.६९ कोटींवरुन ₹७६.३६ कोटींनी वाढून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹७२८.०५ कोटींवर पोहोचला.
- बँकेचा निव्वळ नफा दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹२५०.७९ कोटींवरुन ₹१९.४५ कोटींनी वाढून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹२७०.२४ कोटींवर पोहोचला.
- बँकेच्या निव्वळ अनुत्पादित कर्जांचे एकूण कर्जांशी असलेले प्रमाण दि. ३१ मार्च, २०२०च्या १.५६ टक्क्यांवरुन सुधारुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी १.०४ टक्के इतके राहिले.
- अहवालवर्षी बँकेच्या स्वनिधीत ₹४३१.६६ कोटींची वाढ होऊन दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹३,५२२.०४ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹३,९५३.७० कोटींवर पोहोचला.
- दि. ३१ मार्च, २०२१ रोजी बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १४.२६ टक्के इतके राहिले. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रमाणित केलेल्या ९ टक्क्यांपेक्षा ते अधिक आहे.

३. विभागवार कामगिरी

(i) रिटेल बँकिंग:

अहवालवर्षी कठीण परिस्थिती असतानाही आपल्या बँकेच्या रिटेल विभागाने बँकेच्या व्यवसायवाढीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाचा वाढता वापर, गृह-खरेदीवर स्टँप-ड्युटी मधील सवलत व ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदीकडे वाढलेला ग्राहकांचा कल, यामुळेही किरकोळ कर्ज-व्यवसायात चांगली वाढ दिसून आली. आपल्या बँकेची उत्तम ग्राहक-सेवा आणि किरकोळ व्यवसायावर दिलेला विशेष भर, ह्या बाबीदेखील रिटेल व्यवसायवृद्धीस कारणीभूत ठरल्या.

गतवर्षी रिटेल बँकिंग अंतर्गत "रिटेल बिझनेस ऑपरेशन्स्'(Retail Business Operations) व "बिझनेस् डेव्हलपमेंट'' (Business Development) हे दोन विभाग कार्यरत करण्यात आले. हे दोन्ही विभाग पूर्णत: रिटेल व्यवसायावर लक्ष केंद्रीत करण्याकरिता स्थापन केले गेले होते व त्याचा दृश्य परिणाम अहवालवर्षी दिसून आला. अनेक आव्हाने असतानाही बँकेच्या रिटेल व्यवसायाने अहवालवर्षी चांगली वाढ दर्शविली.

- **किरकोळ कर्जे:**

  अहवालवर्षी आपल्या बँकेचा किरकोळ कर्ज-व्यवसाय १०.४६ टक्क्यांनी वाढला. दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹१०,८५६.९४ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी तो ₹११,९९३.०७ कोटींवर पोहोचला. याव्यतिरिक्त दि. ३१ मार्च, २०२१ रोजी टँजिबल सिक्युरिटी (Tangible Security) ठेवून दिलेल्या कर्जांचा व्यवसायही ₹१,५६२.११ कोटी इतका होता.

  बँकेच्या एकूण कर्ज-व्यवसायाच्या तुलनेत किरकोळ कर्ज-व्यवसाय हा ४८.२७ टक्क्यांवरुन ५१.६६ टक्क्यांवर पोहोचला.

- **किरकोळ ठेवी:**

  अहवालवर्षी आपल्या बँकेत एकूण ८३,११४ नवीन कासा (CASA) खाती उघडण्यात आली. यामध्ये ७४,२९२ बचत

तर ८,८२२ चालू खात्यांचा समावेश आहे. कासा खात्यांमध्ये ₹१,७७३.८२ कोटींची म्हणजेच १६.५४ टक्क्यांची लक्षणीय वाढ अहवालवर्षात झाली. दि. ३१ मार्च, २०२०च्या ₹१०,७२३.९४ कोटींवरुन कासा ठेवी दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹१२,४९७.७६ कोटींवर पोहोचल्या. कासा ठेवींचे एकूण ठेवींशी प्रमाणही २८.१६ टक्क्यांवरून ३०.६३ टक्क्यांवर पोहोचले.

- **प्रधानमंत्री आवास योजना (PMAY):**
  आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये केंद्र सरकारच्या "प्रधानमंत्री आवास योजने" अंतर्गत एकूण १,५६८ अर्ज नॅशनल हाऊसिंग बँकेकडे पाठविण्यात आले. त्यापैकी ९०२ अर्ज मंजूर झाले. या योजनेअंतर्गत अहवालवर्षी ₹२,०७५.२५ लाखांचे अनुदान (Subsidy) विविध गटांतील कर्जदारांस मिळाले.

- **प्राधान्य (Priority) क्षेत्राला कर्ज-पुरवठा:**
  भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये एकूण कर्ज-व्यवसायाच्या ४५ टक्के कर्ज-पुरवठा हा प्राधान्य क्षेत्रास करणे बंधनकारक होते. आपली बँक एकूण ₹१४,४१२.०३ कोटींची कर्जे प्राधान्य क्षेत्रास वितरीत करुन, हे प्रमाण ५२.१४ टक्के राखण्यात यशस्वी झाली.

- **व्यावसायिक कर्जे व सरकारी योजना:**
  लघुउद्योजक व नवउद्यमींसाठी आपली बँक ₹१० कोटींपर्यंत किरकोळ कर्जे वितरीत करते. तसेच उन्नती व मुद्रा या दोन कर्ज-योजनांद्वारेही लघुउद्योजकांसाठी त्यांच्या गरजेनुसार कर्जे उपलब्ध करुन देते. अहवालवर्षी आपल्या बँकेने ₹१०२.५८ कोटींची उन्नती कर्जे व ₹१० कोटींची मुद्रा कर्जे वितरीत केली.

  चीफ मिनिस्टर्स एम्प्लॉयमेंट जनरेशन प्रोग्रॅम (CMEGP) व प्राईम मिनिस्टर्स एम्प्लॉयमेंट जनरेशन प्रोग्रॅम (PMEGP) या शासकीय योजनांद्वारे नवउद्यमींसाठी आपल्या बँकेने अहवालवर्षात अनुक्रमे ₹२.८४ कोटी व ₹३.२६ कोटींची कर्जे वितरीत केली.

  सहकारी बँकिंग क्षेत्रात कुठल्याही तारणाशिवाय मध्यम व लघु-उद्योगांना कर्जे वितरीत करण्यासाठी "क्रेडिट गॅरेंटी ट्रस्ट फॉर मायक्रो ॲण्ड स्मॉल एंटरप्राईझ" (CGTMSE) ची परवानगी मिळवणारी आपली बँक ही पहिली बँक आहे. अहवालवर्षी CGTMSE अंतर्गत आपल्या बँकेने ₹१८३ कोटींची ५६३ कर्जे वितरीत केली आहेत. तसेच "पीएम-स्वनिधी" या शासनाच्या कोव्हिड रिलीफ योजनेअंतर्गत फेरीवाल्यांकरिता ₹१०,००० विनातारण कर्ज उपलब्ध करुन दिले आहे. या योजनेद्वारे एकूण १३१ कर्जे वितरीत करण्यात आली. गुजरात राज्य सरकारच्या "आत्मनिर्भर गुजरात सहाय्य योजने" अंतर्गतही आपल्या बँकेने ₹३२.२५ लाखांची कर्जे वितरीत केली.

- **मायक्रोफायनान्स आणि सेल्फ-हेल्प ग्रुप:**
  अहवालवर्षी आपल्या बँकेकडून गरजू व्यक्ती तसेच महिला यांना मायक्रोफायनान्स आणि बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य करण्यात आले. ४,५०० हून अधिक बचतगट व २,४०० हून अधिक वैयक्तिक

कर्जदारांना मायक्रोफायनान्स अंतर्गत कर्जे वितरीत केली गेली. आपल्या बँकेत बचतगटांची ४,६०० खाती अहवालवर्षी उघडण्यात आली. यामुळे महाराष्ट्राच्या विविध गावांमधील अनेक महिलांपर्यंत आपली बँक पोहोचली. 'महिला आर्थिक विकास महामंडळाच्या' (MAVIM) माध्यमातून आपण अधिकाधिक बचतगटांपर्यंत पोहोचत आहोत. बचतगटांना गतवर्षी आपण ₹५०.२३ कोटींची कर्जे वितरीत केली होती. अहवालवर्षात त्यात ११० टक्के वाढ होऊन ₹१०५.५६ कोटींची कर्जे वितरीत केली गेली. तर मायक्रोफायनान्स कर्ज योजने अंतर्गतही अहवालवर्षी ₹१२ कोटींचे कर्जे-वितरण झाले.

- **नव्याने सुरु झालेल्या उपक्रमांची सद्यस्थिती:**

बिझनेस डेव्हलपमेंट व्हर्टिकल (Business Development Vertical):

जुलै, २०१९ मध्ये आपल्या बँकेच्या योजनांच्या विपणनासाठी (Sales) एक स्वतंत्र टीम स्थापन करण्याचे बँकेने ठरविले होते. या निर्णयानुसार विपणनामध्ये आवड असलेल्या ८० कर्मचाऱ्यांची टीम 'बिझनेस डेव्हलपमेंट व्हर्टिकल' अंतर्गत बनविण्यात आली. हे कर्मचारी ग्राहक-सेवा तसेच बँकिंग योजनांची माहिती महाराष्ट्रातील विविध शाखांमधून ग्राहकांपर्यंत पोहोचवित आहेत.

या टीमच्या सदस्यांना 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर' (BDO) असे संबोधण्यात येते. ह्या BDO टीमला ग्राहकांशी सुसंवाद साधणे, बँकेच्या योजनांची संपूर्ण माहिती देणे व तंत्रज्ञानावर आधारीत सेवा या विषयांवर वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. याव्यतिरिक्त टॅब्लेट (Tablet) सारख्या अद्ययावत उपकरणांद्वारे सुलभरित्या खाते उघडणे, मोबाईल ॲपद्वारा ग्राहकांना त्यांच्या व्यवहारांची माहिती देणे इत्यादी सेवांद्वारे ही टीम ग्राहक-सेवेच्या कक्षा रुंदावत आहे.

अहवालवर्षी या टीमने ₹६५३ कोटींची कर्जे, ₹२३८ कोटींच्या ठेवी व ₹२० कोटींचा इतर आस्थापनांचा व्यवसाय (Third Party Busines), असा एकूण ₹९११ कोटींचा व्यवसाय बँकेस मिळवून दिला. बँकेच्या एकूण किरकोळ कर्ज-व्यवसायाच्या २० टक्के कर्ज-व्यवसाय हा 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स'च्या माध्यमातून मिळाला. आगामी वर्षात बँकेच्या सर्वांगीण व्यवसाय वाढीसाठी 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स'ची संख्या ३०० पर्यंत वाढविण्याचा बँकेचा मानस आहे.

- **प्रॉडक्ट डेव्हलपमेंट टीम (Product Development Team):**

आपल्या ग्राहकांच्या अपेक्षांनुसार आपल्या सेवा व योजनांची आखणी करणे हे सध्याच्या युगात आवश्यक आहे. ग्राहकांच्या गरजा, बाजाराचा कल, तंत्रज्ञानातील बदल व विविध नियामकांचे नियम यांच्या कक्षेत राहून नवीन योजना तसेच विद्यमान योजनांमध्ये वेळोवेळी बदल करावा लागतो.

प्रत्येक ग्राहक हा बँकेसाठी महत्त्वाचा आहे. त्याच्या गरजेनुसार बँकेच्या योजना असाव्यात, याकरिता आपली बँक बाजारातील इतर योजनांचा अभ्यास व त्या अनुषंगाने येणाऱ्या जोखीम निकषांचा (Risk

Indicators) विचार करुन ग्राहकांना उत्तम सेवा प्रदान करण्यासाठी एक तज्ज्ञ गट नेमणार आहे.

विविध योजनांकरिता आपल्या बँकेने करार (Tie-up) केलेले आहेत, त्यामध्ये CGTMSE अंतर्गत विनातारण कर्जे, चीफ मिनिस्टर्स एम्प्लॉयमेंट जनरेशन प्रोग्रॅम (CMEGP), प्राईम मिनिस्टर्स एम्प्लॉयमेंट जनरेशन प्रोग्रॅम (PMEGP) व आत्मनिर्भर गुजरात सहाय्य योजना (AGSY) इत्यादींचा समावेश आहे.

- **कस्टमर रिलेशन्स अँड एक्सपिरिअन्स (Customer Relations & Experience):**

अहवालवर्षी ग्राहक मेळावे किंवा ग्राहकांबरोबर प्रत्यक्ष संवाद वा भेटीगाठी कोव्हिड-१९ निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे आपल्या बँकेची CRE टीम ही दूरध्वनी व ई-मेलच्या माध्यमातून ग्राहकांच्या संपर्कात होती.

अहवालवर्षी आपल्या बँकेच्या कॉल सेंटरच्या माध्यमातून ४.५० लाख ग्राहकांशी संपर्काचे प्रयत्न करण्यात आले व १.५० लाख ग्राहकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला. याद्वारे जवळपास २०,००० व्यवसायाच्या संधी (Business Leads) उपलब्ध झाल्या. याशिवाय ग्राहकांच्या १.२६ लाख तक्रारींचे निवारण करण्यात आले. ग्राहकांचे ६,०३० ई-मेल्स हाताळण्यात आले तर 'ऑपरेशन स्पर्श' अंतर्गत २,००० मिस्ड कॉल्स (Missed Calls) स्वीकारण्यात आले. या सर्व ग्राहकांचे सर्व प्रश्न / तक्रारी समाधानकारकरित्या सोडविण्यात आल्या.

अहवालवर्षी 'कस्टमर रिएन्गेजमेंट' (Customer Re-engagement) या उपक्रमाद्वारे ९५,००० हून अधिक ग्राहकांशी संपर्क साधण्यात आला. या उपक्रमाचे उद्दीष्ट होते ग्राहकांनी आपल्या सेवांचा अविरत लाभ घ्यावा व आपल्या बँकेशी ते कायमस्वरुपी जोडले जावे. या व्यतिरिक्त 'वेल्कम कॉलिंग' (Welcome Calling) उपक्रमाद्वारे नवीन ग्राहकांशी संवाद, वाढदिवस शुभेच्छा, ज्येष्ठ नागरिकांशी तसेच डॉक्टर्स, चार्टर्ड अकाउंटंट्स इत्यादी व्यावसायिकांशी संपर्क साधण्यात आला.

इन-ऑपरेटिव्ह खाती (In-operative Accounts) आणि Deposit Education and Awareness Fund (DEAF) योजनेअंतर्गत निर्गमित केली गेलेली खाती पुनरुज्जीवित करण्यासाठी खातेदारांशी संपर्क साधण्यात आले. तरुण ग्राहक बँकेकडे आकर्षित व्हावा याकरिता 'Bright Minds' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसही उत्कृष्ट प्रतिसाद लाभला व विजेत्यांना प्रत्येकी ₹१,०००/-च्या गिफ्ट कार्डचे पारितोषिक देण्यात आले.

'ऑपरेशन स्पर्श' अंतर्गत अहवालवर्षी विविध शाखांमध्ये 'मिस्टरी ऑडिट' (Mystery Audit) करण्यात आले. ह्या ऑडिटचा उद्देश हा की, बँकेच्या कुठल्याही शाखेत ग्राहक गेला तरीही त्याला एकसारखीच सर्वोत्तम सेवा मिळावी. तसेच शाखांमध्ये असलेले 'May I Help You' काउंटरचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित व्हावे हाही उद्देश यामागे होता.

इतर आस्थापनांच्या उत्पादनांचे विपणन:

- **विमा योजना:**
  आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये बँकेने इतर आस्थापनांच्या विमा व्यवसायातून ₹१२९.७१ कोटींचा विमा हप्ता जमा केला व एकूण ₹२२.६६ कोटींचे उत्पन्न मिळविले.

- **प्रधानमंत्री विमा योजना:**
  आपल्या बँकेने 'एचडीएफसी लाईफ इन्श्युरन्स कं. लि.' च्या सहकार्याने 'प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना' (PMJJBY) तर 'न्यू इंडिया ॲश्युरन्स कं. लि.'च्या सहकार्याने 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना' (PMSBY) ग्राहकांकरिता उपलब्ध केलेल्या आहेत. अहवालवर्षी या व्यवसायातून बँकेने ₹०.०३ कोटींचे उत्पन्न मिळविले.

- **म्युच्युअल फंड:**
  जानेवारी, २०१८ मध्ये आपल्या बँकेने म्युच्युअल फंड योजनांचे विपणन करण्यास सुरुवात केली. सध्या बँक एचडीएफसी, एलआयसी, एल अँड टी, निप्पॉन इंडिया, आदित्य बिर्ला व आयसीआयसीआय प्रुडेन्शियल या म्युच्युअल फंडांचे विपणन करते. अहवालवर्षी एकूण ₹२५.३३ कोटींचा म्युच्युअल फंड व्यवसाय आपल्या बँकेने केला, तर म्युच्युअल फंडांची एकूण एयुएम (AUM) ₹१८६.३५ कोटी इतकी होती. अहवालवर्षी या व्यवसायातून ₹१.१२ कोटींचे उत्पन्न मिळाले.

- **डिमॅट:**
  डिमॅट व्यवहारांकरिता आपली बँक एनएसडीएल (NSDL) व सीडीएसएल (CDSL) या दोन्ही संस्थांशी संलग्न आहे. अहवालवर्षी एकूण १,३४७ नवीन डिमॅट खाती उघडण्यात आली. अशा प्रकारे ३१ मार्च, २०२१ रोजी आपल्या बँकेत एकूण ७८,२५४ डिमॅट खाती अस्तित्वात आहेत. ASBA योजनेद्वारे बँकेने समभागविक्रीच्या (Equity) ६२, राईट्स (Rights) विक्रीच्या २५, तर रोखेविक्रीच्या (Debt) १७ व्यवहारांची पूर्तता केली. वर्षभरात एकूण ८०,००० (IPO) अर्ज हाताळण्यात आले. डिमॅट व्यवहारांद्वारे एकूण ₹३.७० कोटींचे उत्पन्न अहवालवर्षी मिळाले. यापैकी ₹७३.८६ लाखांचे उत्पन्न रेलिगेअर सेक्युरिटीज् लिमिटेडद्वारे उपलब्ध केलेल्या ऑनलाईन ब्रोकिंग सुविधेद्वारे मिळाले. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये ६२५ हून अधिक नवीन ट्रेडिंग खाती उघडण्यात आली.

क्रेडिट कार्ड:

नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI)च्या सहकार्याने आपली बँक रुपे प्लॅटिनम क्रेडिट कार्ड वितरित करते. दि. ३१ मार्च, २०२१ अखेरीस आपल्या बँकेची एकूण २८,००० हून अधिक क्रेडिट कार्ड्स् वापरात आहेत. आपली बँक ग्राहकांना त्यांच्या ठेवींच्या आधारावर कुठल्याही अतिरिक्त कागदपत्राशिवाय तसेच कुठलेही शुल्क न आकारता 'Secured Credit Card' सुद्धा वितरीत करते.

क्रेडिट कार्ड व्यवसायातून आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये बँकेस ₹६.०४ कोटींचे उत्पन्न मिळाले, जे गतवर्षी ₹५.३० कोटी इतके होते.

(ii) घाऊक बँकिंग व्यवसाय:

कोव्हीड-१९ निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर अहवालवर्षी व्यावसायिक कर्जांना मागणी नव्हती. त्याप्रमाणे

आपल्या बँकेनेही काही धोरणात्मक निर्णय घेऊन व्यावसायिक कर्जांमधील जोखीम कमी करण्याच्या उद्देशाने मोठ्या कर्जदारांची कर्जे कमी करण्यावर भर दिला. तसेच मोठ्या प्रमाणावरील कन्सॉर्शियम (Consortium) खात्यांमधील सहभाग कमी केला व विद्यमान कर्जखाती कन्सॉर्शियम (Consortium) मध्ये विभागून कर्जांवर मर्यादा ठेवली. साथरोगाच्या पार्श्वभूमीवर अहवालवर्षी कर्जदारांनीही सावध पवित्रा घेतला. त्यामुळेही कर्जांची उचल होऊ शकली नाही. एलसीबीडी (LCBD) व्यवहारही मागील वर्षीच्या तुलनेत कमी राहिला.

या सर्वांचा एकत्रित परिणाम दिसून आला व व्यावसायिक कर्ज-व्यवसाय दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ₹१२,६८६.५२ कोटी इतका राहिला.

(iii) विदेश विनिमय व्यवसाय:

आपल्या बँकेकडे विदेश विनिमय व्यवसायाचा परवाना वर्ष १९७९ पासून आहे. नऊ फॉरेक्स सेंटर्सच्या माध्यमातून आपली बँक विदेश विनिमय सेवा उपलब्ध करुन देते. अहवालवर्षी आपल्या बँकेचा ग्राहकांशी करण्यात आलेला विदेश विनिमय व्यवसाय ₹३०,२२७.५० कोटी इतका होता. दि. ३१ मार्च, २०२१ रोजी निर्यातीकरिता दिलेली कर्जे ही ₹१,४६९.३२ कोटी इतकी होती. अहवालवर्षी कोव्हिड-१९ साथीच्या पार्श्वभुमीवर आयात-निर्यात व्यवहारांची कागदपत्रे हाताळणे हे जिकिरीचे काम होते. परंतु आपल्या बँकेने सर्व आव्हानांचा यशस्वीपणे सामना करुन ग्राहकांना या कठीण काळातही विदेश विनिमय सेवा उपलब्ध करुन दिली.

आपली बँक दहा महत्त्वाच्या विदेशी चलनांमध्ये व्यवहार करते. तसेच बँकेने जगभरातील अनेक बँकांशी व्यावहारिक संबंध (Correspondent Relations) प्रस्थापित केले आहेत. याव्यतिरिक्त आपली बँक, अकरा सहकारी बँकांनाही विदेश विनिमय सेवा उपलब्ध करुन देत आहे.

(iv) कोषागार विभाग:

बँकेचा कोषागार विभाग हा बँकेच्या नियमित निधी व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतो. आपल्या बँकेचा कोषागार विभाग हा रोख तरलता (Funds Management) व्यवस्थापन करतोच पण त्याचबरोबर बँकेची अतिरिक्त तरलता योग्यरित्या गुंतवून त्यावर नफाही मिळवितो. आपल्या बँकेच्या कोषागार विभागाने गेली अनेक वर्षे बँकेच्या नफ्यात भरीव योगदान देऊन महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे.

अहवालवर्षी मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने नरमाईचे पतधोरण अवलंबून रेपो दरात कपात केली. त्यामुळे निर्माण झालेल्या अनुकूल परिस्थितीचा लाभ घेत कोषागार विभागाने बँकेच्या नफ्यात महत्त्वपूर्ण भर घातली. याव्यतिरिक्त रोख राखीवता प्रमाण (CRR) व वैधानिक तरलता प्रमाण (SLR) या दोन निकषांचेही संपूर्ण वर्षभर काटेकोर पालन करण्यात आले.

विदेश विनिमय व्यवहारांकरिताही आपला कोषागार विभाग शाखांना सहाय्य करतो. कडक निर्बंधांच्या काळातही कोषागार विभागाने ग्राहकांचे आयात, निर्यात, विदेशी चलन हस्तांतरण इत्यादी व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यास मदत केली.

४. डिजिटल बँकिंग विभाग

डिजिटल तंत्रज्ञान हे बँकिंग उद्योगाचा एक अविभाज्य भाग बनलेले आहे. सध्याच्या काळात डिजिटल बँकिंगचे महत्त्व अधिकच अधोरेखित झालेले आहे.

आपल्या बँकेने नेहमीच 'डिजिटल-फर्स्ट' (Digital First) दृष्टीकोन स्वीकारुन काही वर्षांपूर्वीच 'डिजिटल बँकिंग' विभागाची स्थापना केली. उदयोन्मुख तंत्रज्ञान व नवीन व्यावसायिक प्रणालींचा अवलंब करुन वेगाने बदलत असणाऱ्या डिजिटल युगाला आपली बँक समर्थपणे सामोरी जात आहे. आपणास सांगण्यास आनंद होत आहे की, अहवालवर्षात बँकेच्या एकूण व्यवहारांपैकी ८७ टक्के व्यवहार हे डिजिटल माध्यमातून झाले.

आपली बँक सध्या ३० हून अधिक डिजिटल सेवा ग्राहकांना प्रदान करते. यामध्ये बँक ऑन व्हॉट्सॲप, बँक ऑन टॅब, मोबाईल बँकिंग, युनिफाईड पेमेंट इंटरफेस (UPS), सारस्वत बँक १००+, गिफ्ट कार्ड, नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन (NETC), सारस्वत क्विक पे, पॉईंट ऑफ सेल इत्यादी अनेक सेवा डिजिटल माध्यमातून उपलब्ध आहेत.

५. ॲडव्हर्टायझिंग, अलायन्स् ॲण्ड कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स

अहवालवर्षात ग्राहकांच्या संपर्कात राहण्यासाठी अनेक अभिनव कल्पना योजल्या गेल्या. यामध्ये पारंपारिक तसेच नव-माध्यमांद्वारे आपण प्रत्येक ग्राहकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला.

वर्षभरात खालीलप्रमाणे ग्राहक-संपर्काचे विविध मार्ग राबविण्यात आले:

- बँकेच्या स्थापना दिनानिमित्ताने, दि. १४ सप्टेंबर, २०२० रोजी सर्व भागधारक, ग्राहक व कर्मचाऱ्यांप्रती प्रिंट मिडियाद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.
- कोव्हिड योध्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक करण्यासाठी श्री. महेश मांजरेकर यांच्या सहकार्याने एका लघुपटाची निर्मिती करण्यात आली. यामध्ये वैद्यकीय कर्मचारी, पोलिस, स्वच्छता कामगार, अत्यावश्यक व महापालिकेच्या सेवेतील कर्मचारी यांना त्यांच्या सेवेबद्दल अभिवादन करण्यात आले.
- आपल्या बँकेच्या कर्जांवरील किमान व्याजदरांची जाहिरात प्रिंट, रेडिओ, डिजिटल, आउटडोअर व दूरदर्शन या सर्व माध्यमातून करण्यात आली.
- आपली बँक 'LinkedIn' या समाजमाध्यमावरही आता उपलब्ध झालेली आहे. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रॅम व युट्युब या माध्यमांवरही आपल्या बँकेचे अनेक फॉलोअर्स (Followers) आहेत.
- विजय सेल्स आऊटलेट्स तसेच मुंबई मेट्रो येथे बँकेची जाहिरात करण्यात आली.
- बँकेच्या सेवा, योजना, महत्त्वाच्या सूचना, व्याजाचे दर इत्यादींच्या जाहिराती जवळपास ९० शाखांमध्ये करण्यात आल्या.
- इलेक्ट्रॉनिक्स तसेच किराणा इत्यादी विकणाऱ्या आघाडीच्या विक्रेत्यांशी फेस्टिव्हल ऑफरचे करार करण्यात आले.
- इंधनावरील अधिभार, युटिलीटी बिल पेमेंट व ऑनलाईन शॉपिंगवर कॅशबॅक सुविधा देण्यात आल्या.
- 'एबीपी माझा' या टीव्ही चॅनेलवरील 'माझा महाराष्ट्र डिजिटल महाराष्ट्र' या कार्यक्रमात डिजिटल तंत्रज्ञानासंबंधीत चर्चा आयोजित करण्यात येते. अहवालवर्षी आपल्या बँकेने डिजिटल सेवा 'सायबर फसवणुकीपासुन सुरक्षितता' या विषयावरील कार्यक्रम प्रायोजित केले.
- सायबर सुरक्षिततेचे महत्त्व ग्राहकांना पटविण्यासाठी 'जो सतर्क वही सुरक्षित' या व्हिडिओचे प्रसारण करण्यात आले.

६. प्रोजेक्ट् उडान

आपल्या बँकेने नवीन कोअर बँकिंग प्रणालीवर स्थलांतरीत होण्याकरिता "उडान" या महत्त्वाकांक्षी प्रोजेक्टची घोषणा एक वर्षापूर्वी केली होती. बँकेच्या व्यवसायातील वाढ लक्षात घेता, होणाऱ्या बदलांना व आव्हानांना सामोरे जाण्याकरिता नवीन बँकिंग प्रणाली स्वीकारणे आवश्यक होते.

"मे. इन्फोसिस लि." या कंपनीची उपकंपनी असलेल्या "मे. एजवर्व्ह सिस्टिम्स् लि." यांची "फिनॅकल" ही कोअर बँकिंग प्रणाली याकरिता निवडण्यात आली. "फिनॅकल" प्रणालीची सक्षमता तसेच अनेक सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांमधील बँकांमध्ये त्याचा होत असलेला वापर या बाबी लक्षात घेऊन या प्रणालीची अंतिमत: निवड करण्यात आली.

या प्रोजेक्ट अंतर्गत बँकेच्या विविध विभागांचे उदा. डिजिटल बँकिंग, कोषागार (Treasury) इत्यादींचे, ब्रँच बँकिंगबरोबरच एकत्रितरित्या नवीन प्रणालीवर स्थलांतर होणार होते. अहवालवर्षी आपल्या बँकेने "फिनॅकल" प्रणालीच्या सर्व प्रकारच्या कार्यात्मक चाचण्या पूर्ण केल्या. तद्नंतर दि. २६ एप्रिल, २०२१ रोजी आपली बँक या नवीन बँकिंग प्रणालीवर स्थलांतरीत झाली. बँकेचे सर्व विभाग म्हणजेच रिटेल (Retail), घाऊक (Wholesale), कोषागार (Treasury) व डिजिटल (Digital) बँकिंग हे या एकाच प्रणालीवर स्थलांतरीत झाल्यामुळे आता बँकेच्या सेवा अधिक सक्षमतेने ग्राहकांना प्रदान करण्यात येतील. बँकेच्या भविष्यातील व्यवसायवृद्धीचा विचार करता आपली बँक योग्य वेळी नवीन कोअर बँकिंग प्रणालीवर स्थलांतरीत झालेली आहे. परंतु अशा मोठ्या प्रोजेक्टमध्ये प्रारंभीच्या काळात काही समस्या किंवा अडचणी उद्भवतात. आपली माहिती-तंत्रज्ञान (Information Technology) टीम सातत्याने या समस्यांचे बारकाईने निरीक्षण करुन त्यांचे निवारण करीत आहे. "फिनॅकल" प्रणालीची मूलभूत कार्यक्षमता आपल्या बँकेच्या पुढील वाटचालीकरिता महत्त्वपूर्ण ठरेल, याचा आम्हाला विश्वास आहे..

७. इन्फॉर्मेशन सिक्युरिटी (Information Security)

इन्फॉर्मेशन सिक्युरिटी हा विभाग बँकेच्या माहिती व सायबर सुरक्षेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सांभाळतो. आपल्या बँकेच्या अनेक तांत्रिक बाबी म्हणजेच फायरवॉल्स (Firewalls), Anti-Rogue, Anti-Phishing, Anti-Malware, डेटा लॉस (Data Loss) प्रतिबंध, इंटरनेट ॲक्सेस कंट्रोल इत्यादी व्यवस्था योग्य सुरक्षा नियमांचे पालन करुन कार्यरत आहेत, यावर इन्फॉर्मेशन सिक्युरिटी विभागाकडून देखरेख ठेवली जाते.

हा विभाग सायबर सुरक्षेविषयक अनेक प्रकारचे कार्यक्रम राबवितो. तसेच बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेचे प्रशिक्षण व माहिती वेळोवेळी पुरवितो. बँकेच्या ग्राहकांमध्येही सायबर सुरक्षेची जनजागृती व्हावी याकरिता कार्य करतो. अहवालवर्षी बँकेची वेबसाईट, एसएमएस (SMS), सोशल मिडिया या माध्यमांतून तसेच ग्राहकांनी त्यांच्या बँक खात्यांशी संबंधित माहिती अनोळखी व्यक्तीस देऊ नये, याकरिता या विभागातर्फे 'युट्युब'वर व्हिडिओ प्रसारित करण्यात आला. आपल्या शाखांमध्येही सायबर सुरक्षेविषयक पोस्टर्स ग्राहकांच्या माहितीकरिता मोक्याच्या ठिकाणी लावण्यात आले. आपल्या बँकेच्या सायबरसुरक्षा सज्जतेबद्दल 'एबीपी माझा' या टीव्ही चॅनेलवरील 'माझा महाराष्ट्र डिजिटल महाराष्ट्र' या कार्यक्रमातही आपल्या बँकेतर्फे सादरीकरण करण्यात आले.

आपल्या बँकेने सायबर सुरक्षेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता 'इन्फॉर्मेशन सिक्युरिटी' समितीही नेमलेली आहे. अहवालवर्षी या समितीच्या चार बैठका झाल्या.

८. अनुत्पादित कर्जे

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोव्हीड-१९ साथीचा प्रादुर्भाव, परिणामी टाळेबंदी-सदृश परिस्थितीमुळे नियामक यंत्रणा व न्यायपालिकेसमोर अनेक अडचणी आल्या. वाहतुकीवरील बंधने, लोकांच्या एकत्र येण्यास मज्जाव व न्यायालये बंद असल्यामुळे अनुत्पादित कर्जांची वसुली मंदावली. आपल्या बँकेसही मालमत्तांची विक्री करण्यास व न्यायालयाकडून तसे आदेश (Orders) मिळविण्यात अनेक अडचणी आल्यामुळे वसुलीवर बंधने आली.

अनुत्पादित कर्जांत वाढ होण्याची शक्यता गृहीत धरुन आपल्या बँकेने कर्ज-वसुलीवर भर दिला. त्याचप्रमाणे 'वसुली' विभागास निर्देश देऊन जलदगतीने वसुली (Quick Recovery) करण्यास सांगण्यात आले. वसुलीकरिता अनेक पर्यायही वापरण्यात आले. यामध्ये ऐच्छिक परतफेड (Voluntary Repayment), कर्जांची पुनर्रचना, कर्ज-परतफेडीसाठी तडजोड (Compromise Settlements), एकरकमी परतफेड आणि परस्पर संमतीने मालमत्तांची विक्री असे अनेक पर्याय वापरून वसुली केली गेली.

या विभागातील सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे आपल्या बँकेने अनुत्पादित कर्जांच्या वसुलीत चांगली कामगिरी बजावली. परिणामी दि. ३१ मार्च, २०२० रोजी बँकेची ढोबळ अनुत्पादित कर्जे ₹ ३५७.९१ कोटींनी तर निव्वळ अनुत्पादित कर्जे ₹१०३.९८ कोटींनी कमी करण्यात आपण यशस्वी झालो.

आपल्या बँकेने अनुत्पादित कर्जांची जलदगतीने वसुली होण्याकरिता विशेष रिटेल रिकव्हरी ऑफिसर्सची नियुक्त केलेली आहे. ही टीम किरकोळ अनुत्पादित कर्जे व क्रेडीट कार्डस्च्या वसुलीवर लक्ष केंद्रीत करणार आहे. या टीमने सर्वप्रथम मुंबई, पुणे व नागपूर या विभागांतून वसुलीच्या कामकाजास प्रारंभ केलेला आहे.

अहवालवर्षी अनुत्पादित कर्ज वसुलीच्या चांगल्या कामगिरीमुळे नवीन अनुत्पादित कर्जात जरी ₹ ३०६.३८ कोटींची वाढ झालेली दिसत असली, तरी एकुण ढोबळ अनुत्पादित कर्जे गतवर्षीच्या ₹ १,२४९.८० कोटींच्या तुलनेत अहवालवर्षी ₹ १,२००.५८ कोटींवरच राहिली. परिणामी ढोबळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण गतवर्षीच्या ४.९३ टक्क्यांवरुन सुधारुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ४.५८ टक्क्यांवर तर निव्वळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण १.५६ टक्क्यांवरुन १.०४ टक्क्यांवर आले.

निष्कासित (Write-Off) कर्जांची वसुली:

निष्कासित केलेल्या कर्ज-खात्यांमधून अहवालवर्षी ₹ ५.२८ कोटींची वसुली करण्यात आली. वसुलीची शक्यता कमी असतानाही आपल्या बँकेने प्रयत्नपूर्वक ही रक्कम वसूल केली. निष्कासित कर्जांच्या वसुलीची रक्कम ही बँकेच्या नफ्यात थेट भर घालत असते.

प्रोव्हिजन कव्हरेज प्रमाण:

अनुत्पादित कर्जांवरील तरतुदीकरिता आपली बँक आयआरएसी (IRAC)चे नियम काटेकोरपणे पाळते. हे नियम पाळून आवश्यक प्रमाणापेक्षा अधिक तरतूदही करते. अहवालवर्षी आपल्या बँकेने ₹१९०.३१ कोटींची अतिरिक्त तरतूद केलेली आहे. अनुत्पादित कर्जांकरिता केलेल्या तरतुदीचे प्रमाण म्हणजेच प्रोव्हिजन कव्हरेज प्रमाण (Provision Coverage Ratio), हे दि. ३१ मार्च, २०२१ रोजी ७४.८४ टक्क्यांवर पोहोचले. गतवर्षी हेच प्रमाण ६६.७५ टक्के इतके होते. प्रोव्हिजन कव्हरेजचे सुदृढ प्रमाण हे अनुत्पादित कर्जांसाठी भक्कम तरतूद केल्याचे दर्शविते.

९. भांडवल पर्याप्तता (CRAR)

बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण हे गतवर्षीच्या १४.७५ टक्क्यांवरुन दि. ३१ मार्च, २०२१ रोजी १४.२६ टक्के इतके राहिले.

१०. नफा-वितरण

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये आपल्या बँकेच्या निव्वळ नफ्यामधून खालीलप्रमाणे तरतूद करण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे:

तक्ता क्र. १ (₹ लाखांत)

	२०२०-२१	२०१९-२०
राखीव निधी (२५%)	६,७५६.१२	६,२६९.८७
आकस्मिकता निधी (१०%)	२,७०२.४५	२,५०७.९५
शैक्षणिक निधी (१%)	२७०.२५	२५०.७९
प्रस्तावित लाभांश १०.५०% (प्रेफरन्स समभाग)	५७१.६६	--
प्रस्तावित लाभांश २०% (इक्विटी समभाग)	४,६७०.००	--
कर्मचाऱ्यांसाठी सानुग्रह अनुदान २०%	४,५३६.००	३,१००.००
सभासद कल्याण निधी	५०.००	५०.००
कर्मचारी कल्याण निधी	१०.००	१०.००
सार्वजनिक, धर्मादाय व सहकारी कार्यासाठी निधी (१%)	२७०.२५	२५०.७९
गुंतवणूकविषयक जोखीम निधी	५,०००.००	७,०००.००
विशेष राखीव निधी	२,०००.००	२,०००.००
सर्वसाधारण राखीव निधी	१८५.००	३,६३९.६७
पुढील वर्षाकरीता शिल्लक	१२०.६९	११७.९५
एकूण	**२७,१४२.४२**	**२५,१९७.०२**

इक्विटी समभाग लाभांश:

दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरिता इक्विटी भागधारकांना २० टक्के लाभांश देण्याची संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

प्रेफरन्स समभाग लाभांश:

दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता प्रेफरन्स भागधारकांना १०.५० टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

सभासद कल्याण निधी:

सभासद कल्याण निधीकरिता ₹५०.०० लाख वर्ग करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. ही रक्कम जमेस धरून एकूण सभासद कल्याण निधी ₹१,३७३.५० लाख इतका असेल. अहवालवर्षी एकूण ८५५ सभासदांनी वैद्यकीय मदतीचा लाभ घेतला, तसेच सभासदांच्या ९ गुणवंत पाल्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कर्मचाऱ्यांसाठी सानुग्रह अनुदान:

दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता बँकेच्या कर्मचाऱ्यांना २० टक्के सानुग्रह अनुदान देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

सार्वजनिक धर्मादाय आणि सहकार क्षेत्राच्या कार्यासाठी निधी:

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्र. UBD/(PCB)/BPD/Cir./४३ दि. ११ एप्रिल, २००५ नुसार परवानगी दिल्याप्रमाणे सामाजिक व धर्मादाय कार्याकरिता ₹२७०.२५ लाख इतकी तरतूद करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

विशेष राखीव निधी:

प्राप्तिकर खात्याच्या तरतुदीनुसार विशेष राखीव निधीत ₹२,००० लाख वर्ग करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहेत.

आर्थिक वर्ष २०१९-२०चा प्रेफरन्स समभागांवरील लाभांश:

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्र. RBI/२०१९-२०/२१८ दि. १७ एप्रिल, २०२० नुसार, आर्थिक वर्ष २०१९-२०चा प्रेफरन्स समभागांवरील लाभांश आपल्या बँकेने वितरीत केला नव्हता. परंतु, हा लाभांश

प्रेफरन्स भागधारकांना मिळावा याकरिता आपल्या बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा केला होता. आपल्या पाठपुराव्यानंतर दि. २९ डिसेंबर, २०२० रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रेफरन्स लाभांश वितरणास मंजुरी दिली. या प्रेफरन्स समभाग लाभांशाची १०.५० टक्के या दराने ₹५.७२ कोटींची तरतूदही आपल्या बँकेने याआधीच केलेली आहे. येत्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांची मंजुरी घेऊन आर्थिक वर्ष २०१९-२०चा हा लाभांश, प्रेफरन्स भागधारकांना वितरीत करण्यात येईल.

११. बँकेच्या उपविधी क्र. ५ (e) (vii) मध्ये सुचविलेली दुरुस्ती

उपविधी क्र. ५ (e) (vii): 'ग्राहकांच्या वतीने रोखे खरेदी-विक्रीचे किंवा तत्सम व्यवहार हाताळणे, कर्जांचे व्यवहार हाताळणे (the negotiating of Loans and advances)' असा आहे.

आपली बँक ग्राहकांच्या वतीने पोर्टफोलिओ मॅनेजमेंट स्कीम (PMS) अंतर्गत कोणतेही गुंतवणुकीचे व्यवहार करत नाही. बँक ही गुंतवणुक सल्लागार (Custodian) किंवा एजंट म्हणूनही काम करीत नाही. परंतु, असे निदर्शनास आले की वरील उपविधी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्र. DCBR.BPD(PCB)MC No. ४/१६.२०.०००/२०१५-१६ दि. १ जुलै, २०१५ला अनुसरुन नाही. या परिपत्रकानुसार नागरी सहकारी बँका ग्राहकांच्या वतीने पोर्टफोलिओ मॅनेजमेंट स्कीम (PMS) अंतर्गत ग्राहकांचे गुंतवणुक सल्लागार किंवा एजंट म्हणून सेवा देऊ शकत नाही. म्हणूनच उपविधी क्र. ५ (e) (vii) वगळण्याचा प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

१२. बँकेला मिळालेले पुरस्कार

अहवालवर्षी आपल्या बँकेस खालील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

- **फोर्ब्स २०२१ जागतिक सर्वेक्षण:**
  फोर्ब्स या जागतिक प्रतिष्ठित अमेरिकन बिझनेस मॅगझीनने जगातील सर्वोत्तम बँकांच्या यादीत आपल्या बँकेचा सलग दुसऱ्या वर्षी समावेश केला आहे. फोर्ब्स हे व्यापार तंत्रज्ञान व वित्तीय बाजारपेठांवरील विस्तृत लेखांकरिता ओळखले जाते. फोर्ब्सने स्टॅटिस्टा या मार्केट रिसर्च फर्मच्या सहकार्याने २३ देशांमधील विविध बँकांचे सर्वेक्षण केले. याकरिता ४०,००० ग्राहकांची बँकिंग संदर्भातील मते जाणून घेतली. सतत दुसऱ्या वर्षी फोर्ब्सने आपल्या बँकेचा सर्वोत्तम बँकांच्या यादीत समावेश करणे ही खरोखरच अभिमानाची व कौतुकास्पद बाब आहे. आपली बँक ग्राहकांनी दाखविलेला हा विश्वास कायम राखण्यासाठी कसोशीने प्रयत्न करेल.

- **डिजिटल टेक्नॉलॉजी / सायबर सुरक्षा पुरस्कार:**
  दि. २३ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या FCBA २०२० ऑनलाईन पुरस्कार सोहळ्यात आपल्या बँकेस 'बेस्ट डिजिटल बँक' व 'बेस्ट ई-पेमेंट इनिशिएटीव्ह' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

  दि. १७ मार्च, २०२१ रोजी झालेल्या व्हर्च्युअल कार्यक्रमात आपल्या बँकेस इंडियन बँक्स असोसिएशनतर्फे 'सहकारी बँक' श्रेणी अंतर्गत प्रतिष्ठेच्या 'बेस्ट टेक्नॉलॉजी बँक', 'बेस्ट आय.टी. रिस्क ॲण्ड सायबर सिक्युरिटी इनिशिएटीव्हज्' तसेच 'बेस्ट डिजिटल फायनान्शियल इन्क्लुजन' (उपविजेते) या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सारस्वत बँकेने 'सहकारी बँक' श्रेणीमधील तीनही पुरस्कार पटकावून आगळी-वेगळी हॅटट्रीक नोंदविली. तर 'बेस्ट टेक्नॉलॉजी बँक' हा पुरस्कार सलग पाचव्यांदा जिंकून एक अनोखा विक्रम आपल्या नावावर केलेला आहे.

आपल्या बँकेस 'डायनॅमिक सीआयएसओ एक्सलन्स अवॉर्ड २०२१' मध्ये 'Resilient CISO Award' ने सुद्धा सन्मानित करण्यात आले. हे पुरस्कार बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील नामांकित व्यावसायिकांच्या पॅनेलतर्फे जाहीर करण्यात आले.

१३. सामाजिक बांधिलकीचे उपक्रम

आपली बँक गेली अनेक वर्षे समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून अनेक विविध सामाजिक उपक्रमांना मदत करते. अहवालवर्षी कोव्हिड-१९ या वैश्विक साथीचा सामना संपूर्ण जगभरात करावा लागला. आपल्या देशास तसेच विशेषत: महाराष्ट्रास याचा फटका मोठ्या प्रमाणावर बसला. या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन व आपल्या राज्याप्रती असलेल्या बांधिलकीच्या भावनेतून आपल्या बँकेने मुख्यमंत्री निधीत ₹१ कोटींची मदत केली. त्याचप्रमाणे, आपल्या बँकेने 'क्रिकेटर्स फाऊंडेशन ट्रस्ट' या संस्थेलाही ₹३ लाखांची देणगी अहवालवर्षात दिली. मुंबई क्रिकेटसाठी योगदान दिलेल्या वृद्ध आणि गरजू क्रिकेटपटुंच्या वैद्यकीय व आर्थिक सहाय्याकरिता हा ट्रस्ट निधी जमवित आहे.

या व्यतिरिक्त शैक्षणिक, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या २६३ संस्थांना एकूण ₹ ३३.०७ लाखांच्या देणग्या बँकेच्या 'ऋणानुबंध' उपक्रमाअंतर्गत देण्यात आल्या.

१४. इतर घडामोडी

आपली बँक ग्राहकांपर्यंत पोहोचण्याकरिता तसेच संभाव्य ग्राहकांना आणि गुंतवणुकदारांना बँकिंग व आर्थिक क्षेत्रात साक्षर करण्याकरिता नेहमीच सक्रीय असते. अहवालवर्षातही बँकेने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध सहकारी पतसंस्थांसाठी विनामुल्य शैक्षणिक चर्चासत्रांचे आयोजन केले होते. यामध्ये आर्थिक जगताचे बदलणारे पैलु, डिजिटल बँकिंगची आवश्यकता, सहकारी पतसंस्थांचे महत्त्व, कर्ज आणि ठेवींचे विविध प्रकार, कर्जांच्या प्रस्तावाचे विश्लेषण, तसेच ग्राहक-सेवा, संभाषण कौशल्य, टीमवर्क इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

१५. संचालक मंडळाची निवडणूक

आपल्या बँकेचे विद्यमान संचालक मंडळ हे पाच वर्षांच्या कालावधीकरिता दि. ६ ऑगस्ट, २०१६ रोजी निवडून आले होते. २०२१ ते २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता संचालक मंडळ निवडणूकीची प्रक्रिया आपल्या बँकेच्या उपविधी क्रमांक ५६, मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह ॲक्ट २००२ चे कलम ४५ व मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह रुल्स २००२ च्या नियम १९ परिच्छेद (१)(अ) अंतर्गत सुरू करण्यात आलेली आहे.

मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह रुल्स २००२ च्या नियम १९ परिच्छेद (१)(अ) अंतर्गत संचालक मंडळाने आपल्या मुदतपूर्तीपूर्वी ६० दिवस नवीन संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या आयोजनाची व त्या संदर्भातील सर्वसाधारण सभेची तारीख, वेळ व स्थळ ठरावामार्फत योजावी लागते. तसेच निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता रिटर्निंग ऑफिसरची नेमणूक ठरावाद्वारे करावी लागते.

त्यानुसार, दि. २३ एप्रिल, २०२१च्या बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत वर्ष २०२१ ते २०२६ या कालावधीसाठी निवडणुका घेण्याकरिता सर्वसाधारण सभा घेण्याचे ठरले.

परंतु, कोव्हिड-१९ निर्बंधांमुळे ही सर्वसाधारण सभा आयोजित करणे शक्य झाले नाही.

त्यानंतर, दि. ११ जून, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत वर्ष २०२१ ते २०२६ या कालावधीसाठी बँकेचे संचालक मंडळ निवडण्याकरिता गुरुवार, दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता प्राचार्य बी. एन. वैद्य सभागृह, २रा मजला, राजा शिवाजी विद्या संकुल, पाटकर गुरुजी

चौक, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व) मुंबई - ४०० ०१४ येथे सर्वसाधारण सभा घेण्याचे निश्चित केले आहे.

मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी रुल्स २००२ च्या नियम १९ परिच्छेद (१)(अ) अंतर्गत, संचालक मंडळाने श्री. जयंत डी. पाटील, डिस्ट्रीक्ट डेप्युटी रजिस्ट्रार, मुंबई (१) शहर यांची २०२१ ते २०२६ या कालावधीकरिता होणाऱ्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी रिटर्निंग ऑफिसर म्हणून नेमणूक केली आहे.

मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी रुल्स २००२ च्या नियम १९ परिच्छेद (१)(ब) अंतर्गत, या निवडणूकी संदर्भातील माहिती बँकेच्या कार्यकारी संचालकांनी मा. सेंट्रल रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, नवी दिल्ली यांना कळविलेली आहे.

१६. संचालक मंडळाची रचना

आपल्या बँकेच्या संचालक मंडळाची रचना मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ व बँकेच्या पोटनियमांनुसार केली जाते. आपल्या बँकेच्या संचालक मंडळात कार्यकारी संचालकांव्यतिरिक्त सोळा संचालक आहेत. यामध्ये नामवंत, प्रतिष्ठित आणि आर्थिक / बँकींग व इतर क्षेत्रांतील अनुभवी व तज्ज्ञ संचालकांचा समावेश आहे.

आपल्या बँकेचे संचालक, श्री. ए. ए. पंडित यांनी वैयक्तिक कारणास्तव बँकेच्या संचालक पदाचा राजीनामा दिला व तो दि. २४ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. श्री. पंडित हे चार्टर्ड अकाऊंटंट असून ICFAI चे 'डिप्लोमा इन बिझनेस फायनान्स' पदवीधर आहेत. श्री. पंडित यांनी बँकेच्या माहिती तंत्रज्ञान (IT), जोखीम व्यवस्थापन (Risk Management), ऑडीट व विविध धोरणे (Policies) राबविण्यात दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल बँक त्यांची सदैव ऋणी राहील.

श्री. किशोर गुरुदास मसुरकर यांना दि. २३ एप्रिल, २०२१ रोजी बँकेच्या संचालक मंडळावर स्वीकृत (Co-opt) करुन घेण्यात आले. श्री. मसुरकर हे मुंबई विद्यापीठातून एम.एस.सी. (बायो-केमिस्ट्री) पदवीधर असून त्यांनी जमनालाल बजाज इन्स्टिट्युट ऑफ मॅनजमेंट स्टडीजमधून 'डिप्लोमा इन ॲडमिनिस्ट्रेटीव्ह मॅनेजमेंट' पूर्ण केलेले आहे. नेत्रविषयक संशोधन व उत्पादन करणाऱ्या एन्टोड इंटरनॅशनल ग्रुप या फार्मास्युटिकल कंपनीचे ते अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आहेत. ही कंपनी जागतिक स्तरावरील औषध-विषयक संशोधन क्षेत्रात गेली तीस वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहे. तसेच श्री. मसुरकर हे विविध सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांमध्येही सक्रिय आहेत.

अहवालवर्षी आपल्या बँकेच्या संचालक मंडळाच्या एकूण २४ सभा झाल्या.

संचालकांना कर्जे:

बँकेच्या कोणत्याही संचालकाने आपल्या बँकेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नाही. ही आपल्या बँकेची गेल्या अनेक वर्षांची स्वागतार्ह व निकोप परंपरा आहे. याचे प्रावधान आपल्या बँकेच्या उपविधी क्र. ५५ आणि ६३(सी) मध्ये करण्यात आले आहे.

१७. सभासद

दि. ३१ मार्च, २०२१ अखेरीस आपल्या बँकेचे पन्नास किंवा अधिक समभाग असणाऱ्या सभासदांची संख्या २,३७,२६२ इतकी झाली. तर नाममात्र सभासदांची संख्या ८८,८६४ इतकी आहे.

१८. वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती

भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यांच्या परिपत्रक क्र. RBI/२०२१-२२/२५ Ref. No. DoS.CO.ARG/SEC.०१/०८.९१.००१/२०२१-२२ दि. २७ एप्रिल, २०२१ नुसार नागरी सहकारी बँकांमधील वैधानिक लेखापरीक्षकाच्या नेमणुकीकरिता नियमावली जाहीर